महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२४-२५/ 3015 दिनांक:- 21 SEP 2024

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याबाबत.**

**संदर्भ** :- मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे जा.क्र.१८/तंशिसं विकाप /२०२४-२५/३७७/ दि.२०/०९/२०२४

महाडिबीटी पोर्टलवरील निर्देशित केल्यानुसार **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता**, महाडिबीटी पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज (नवीन /नुतनीकरण ) भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली असून दि . १७/०९/२४ ते १९/०९/२४ पर्यंत संस्थेत मोहिम राबवून विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्या करिता आपणास सुचित करण्यात आलेले आहे. परंतु डॅशबोर्ड नुसार अद्याप पर्यंत २५३७ अर्ज नोंदणी झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. **याबाबत मा. प्रधान सचि व, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी सदर नोंदणीबाबत तिव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.**

संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास सुचित येते की, आपल्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज ( मुली व मुले) भरुन घेण्या करिता . संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची नेमणूक करून दि . २३ ते २७ सप्टेंबर २०२४ या कालावधी दरम्यान संस्था स्तरावर अर्ज भरणेबाबत Mission Mode मध्ये कार्यवाही करण्यात यावी. तसा अहवाल या कार्यालयास दररोज ई-मेलवर पाठविण्यात यावा.

सहपत्र :- संदर्भिय संलग्न

( डॉ. सचिन बि. सोलंकी )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

महाराष्ट्र शासन
# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डोबीटी पोर्टल /शिष्य./२०२४-२५/2902 दिनांक:- 12 SEP 2024

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :- ज्या मुलीच्या कुटुंबाचे वर्षिक उत्पन्न रु. ८ लाख किंवा त्यापैक्षा कमी आहे. अशा सर्व मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क मध्ये १०० टक्के सवलती बाबत.**

**संदर्भ** :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि. ११/०९/२०२४ रोजी घेण्यात आलेली बैठक.

महाडिबीटी पोर्टलवरील निर्देशित केल्यानुसार **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता**, महाडिबीटी पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज (नवीन /नुतनीकरण ) भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील अनुदान उपलब्ध असल्याने, सदर योजनेचा लाभाचा पहीला हप्ता माहे. ऑक्टोबर पर्यंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम वितरीत करावयाची नियोजि त आहे.. त्याअनुषंगाने संदर्भिय बैठकीमध्ये खालील प्रमाणे सुचना देण्यात आलेल्या आहेत.

१. ज्या मुलीच्या कुटुंबाचे वर्षिक उत्पन्न रु. ८ लाख किंवा त्यापैक्षा कमी आहे, अशा सर्व मुलींना (EBC/EWS/SEBC/OBC) शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क मध्ये १०० टक्के सवलती देण्यात आलेली असल्यामुळे अशा विद्यार्थीनीकडून प्रवेशाच्या वेळी **शिक्षण शुल्काची रक्कम आकारण्यात येवू नये.** मुलींकडून परीक्षा शुल्क घेण्यात यावे.

२. तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सुचना फलकांवर लावण्यात यावी.

३. संस्थांनी, संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची सदर शिष्यवृ त्ती योजनेकरिता मुली व मुलांना डीबीटी पोर्टलवर अर्ज करतेवेळी येणा-या अडचणीचे निराकरण करण्या करिता नियुक्ती करण्यात यावी.

४. **संस्थांनी पात्र विद्यार्थ्याचे जास्तीत जास्त अर्ज ( नवीन / नुतनी करण) प्राप्त् होण्यासाठी दि. १७/०९/२०२४ ते १९/०९/२०२४ कालावधीत संस्था स्तरावर विशेष मोहिम राबवून, शिकत असलेल्या पात्र विद्यार्थ्या कडून संबंधित योजनेसाठीचा परीपुर्ण अर्ज सदर कालावधीत भरुन घेवून अर्ज मंजूरी करिता ऑनलाईन पाठविण्यात यावे.**

सदर योजनेच्या अंमलबजावणी करिता संस्थेतील नेमणूक करण्यात आलेल्या प्राध्यापकांची माहिती खालील दिलेल्या गुगल फार्म मध्ये दि. १३/०९/२०२४ पर्यंत भरण्यात यावे.

गुगल लिंक :- **http://forms.gle/XULS9j79UxaovWs36**

( डॉ. सचिन वि. सोलंकी )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६
ई-मेल-desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट:http://www.dtemaharashtra.gov.in

कालमर्यादीत : स्पीडपोस्ट / ई-मेलद्वारे
महत्वाचे परिपत्रक

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/ ३७८
दिनांक :- २०/०९/२०२४

विषय : शैक्षणिक वर्ष-२०२४-२५ करीता, डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याबाबत.

संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/ ३५७, दि:- २२/०८/२०२४
२. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/ ३६८, दि:- ०९/०९/२०२४

उपरोक्त विषयान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया दि.२५/०७/२०२४ पासून सुरु झालेली असून संदर्भ क्र. (१) नुसार विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज भरणेबाबत व सदर शिष्यवृत्ती योजनेची माहिती देणेबाबत कळविण्यात आले होते.

याबाबत विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांमध्ये याबाबत पात्र लाभार्थी विद्यार्थीनींना योजनेच्या लाभ प्राप्त होण्याच्या दृष्टीने संदर्भ क्र. (२) च्या परिपत्रकानुसार दि. १७ ते १९ सप्टेंबर, २०२४ दरम्यान विशेष मोहिम राबवून सर्व पात्र विद्यार्थीनींकडून संस्थेतील संगणक प्रयोगशाळेत डीबीटी पोर्टलवर प्रत्यक्ष अर्ज भरणेबाबत कळविण्यात आलेले होते.

असे निदर्शनास येत आहे की, सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्ज भरण्याकरीता अत्यंत अल्प प्रतिसाद आहे. याबाबत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी सदर नोंदणी अत्यंत संथ गतीने होत असल्याबाबत तिव्र नाराजी व्यक्त केलेली आहे व त्याबाबतची कारणे नमुद करण्याबाबत निर्देशित केले आहे.

सहसंचालक, सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांना निर्देशित करण्यात येते की, सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता पात्र विद्यार्थीनींची जास्तीत जास्त नोंदणी करुन घेणेबाबत व्यक्तीशः लक्ष घालून आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांमध्ये Camp लावून डीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्यात यावेत. याकरीता जिल्हास्तरावर विभाग प्रमुख/वरीष्ठ अधिव्याख्याता दर्जाच्या अधिकाऱ्याची दि. २३ ते २७ सप्टेंबर, २०२४ या दरम्यान संस्थास्तरावर अर्ज भरणेबाबत Mission Mode मध्ये कार्यवाही करणेकरीता प्रतिनियुक्ती करावी.

याबाबतचा संस्थानिहाय अहवाल (नवीन/नुतणीकरन अर्ज) या तपशिलांसह दि. २३/०९/२०२४ ते २७/०९/२०२४ या दरम्यान दररोज desk18@dtemaharashtra.gov.in या ई-मेलवर पाठविण्यात यावा.

वरील बाबतीत सहसंचालकांनी योग्य ते निर्देश संस्थांना द्यावेत व विद्यार्थीनींची नोंदणी पुरेशा प्रमाणात नोंद करुन द्यावी. उपरोक्त कार्यवाही प्रथम प्राधान्याने करावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत माहितीकरीता:

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरीता:

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर. यांना माहिती व त्यांच्या अधिनस्त व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्थांना उपरोक्त सर्व परिपत्रकांतील सूचनांचे पालन काटेकोररित्या करण्यासाठी सूचित करण्याकरिता.

F/c

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६
ई-मेल-desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे

क्रमांक :- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/ ३५७
दिनांक :- २२ / ०८ / २०२४

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजीनगर /अमरावती/नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता, डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याबाबत....

संदर्भ : १.उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा.नि. क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४/दि.०७/१०/२०१७
२.उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८/०७/२०२४.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४, दि.११/०७/२०२४.
४.या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३११ दि.२३/०७/२०२४
५.महाआयटी यांचे दि. २३/०७/२०२४, दि. २५/०७/२०२४ रोजी ईमेलद्वारे प्राप्त संदेश.
६.या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/३५६ दि.२२/०८/२०२४

सन २०१८-१९ या वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांकरिता बनविलेल्या महाडीबीटी (संकेतस्थळ - https://mahadbt.maharashtra.gov.in) पोर्टलद्वारे तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

महाआयटी यांच्या संदर्भ क्र.५ च्या ईमेल्सनुसार महाडीबीटी पोर्टलवर नोंदणीकृत असणाऱ्या (Registered Institute) संस्थांना, संस्थांची माहिती (Institute Profile) अद्ययावत करण्यासाठी डीबीटी पोर्टल दि.२३.०७.२०२४ पासून सुरु करण्यात आलेले आहे याबाबत संदर्भ क्र.६ च्या पत्रान्वये, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या सर्व विभागीय कार्यालयांना त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या संस्थाना, संस्थांची माहिती अद्ययावत करण्यासाठी सूचित करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

तसेच, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता, डीबीटी पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना अर्ज ( नवीन /नुतनीकरण ) भरण्याची प्रक्रिया दि.२५ /०७ /२०२४ पासून सुरु करण्यात आलेली आहे. सोबत डीबीटी पोर्टलवर नोटीस अंतर्गत अर्ज भरण्याबाबतच्या देण्यात आलेल्या सूचनेचा स्क्रीन शॉट जोडलेला आहे.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांचा, संस्थेत शिकणाऱ्या उपरोक्त योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज ( नवीन /नुतनीकरण ) लवकरात लवकर भरुन घेण्याबाबत व संस्था स्तरावर प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता, संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन तात्काळ निकाली ( मंजूर / नामंजूर ) काढण्याबाबत सूचित करण्यात यावे.

➢ महत्त्वाची सूचना- विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्थ येणाऱ्या संस्थांना खालील सूचना देखील द्याव्यात.

१. संस्थांनी डीबीटी पोर्टलवरील संबंधित योजनांसाठी असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Profile अद्ययावत करावी.
२. संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून देऊन, संस्थेत शिकत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना संबंधित योजनेसाठीचा परिपूर्ण अर्ज, ऑक्टोबरपूर्वी भरण्याबाबत कळविण्यात यावे. जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.
३. विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्था प्रमुखांनी स्वत: योग्य ती दक्षता घ्यावी.
४. संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन निकाली ( मंजूर / नामंजूर ) करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे.
५. यापुढे संस्था स्तरावर प्राप्त झालेले अर्ज संस्था स्तरावर तपासणीसाठी ( मंजूर / नामंजूर ) प्रलंबित राहील्यास किंवा
६. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन-दोन शिष्यवृत्ती योजनांचा ( केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही शिष्यवृत्ती योजनांचा) लाभ प्राप्त करुन घेतल्यास किंवा
७. संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

तसेच विभागीय कार्यालयांनी डीबीटी पोर्टलवर विभागीय कार्यालयाच्या लॉगीन आयडीमध्ये उपरोक्त योजनांचे पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त होत असलेले संस्थास्तरावर मंजूर झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन निकाली ( मंजूर / नामंजूर ) करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे.

➢ विभागीय कार्यालयासाठी महत्त्वाची सूचना :-

डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांच्या अर्जाच्या तपासणीसाठीचा मुख्य कार्यालय स्तर ( DTE ) (Desk 2) सन २०२१-२२ पासून वगळण्यात आले असुन ( विभागीय कार्यालयांना पत्र क्र.१८/तंशिस/डीबीटी/विकाप/२०२१-२२/०५, दि.०५/०१/२०२२ व्दारे कळविण्यात आले आहे.) विभागीय कार्यालयांनी मंजूर केलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यासाठी अर्ज थेट मुख्य कार्यालयाच्या DDO लॉगीन अंतर्गत योजनेच्या मंजूर लाभाचे देयक बनविण्याकरिता प्राप्त होत असल्या कारणाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांच्या अर्जाची तपासणी करतेवेळी खालील बाबीं तपासून अर्ज मंजूर / नामंजूर करावे.

१) डीबीटी पोर्टलवर विभागीय कार्यालयाच्या लॉगीनआयडीमध्ये उपरोक्त दोन्ही योजनांचे पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त होत असलेले संस्थास्तरावर मंजूर झालेले अर्ज विभागीय स्तरावर छाननी ( मंजूर / नामंजूर )करताना सदर विद्यार्थी हा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेशित झालेला आहे किंवा कसे याची तपासणी करुन,संदर्भ क्र.१ च्या शासन

निर्णयातील ( पान क्र.८ ) क्र. ४ नुसार, "उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / शासकीय विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून ) मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे ( व्यवस्थापन कोट्यातील / संस्थास्तरावरील प्रवेश वगळून ) प्रवेशित" असलेल्या विद्यार्थ्यांचेच अर्ज योजनेच्या शासन निर्णयातील पात्रतेच्या इतर अटी व शर्ती नुसार तपासून मंजूर करावे.

२) जर संस्थेकडून वरील नमूद बाबींची पूर्तता न करणारे अर्ज मंजूरीसाठी पाठविण्यात आल्यास असे अर्ज नामंजूर/रद्द ( Reject) करून अशा संस्थांना तात्काळ याबाबतची नोटीस बजावण्यात यावी जेणेकरुन भविष्यात संस्थामार्फत अपात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विभागीय कार्यालयांना प्राप्त होणार नाहीत.

३) अपात्र विद्यार्थ्याला योजनेचा लाभ दिला गेल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी विभागीय कार्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत. १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर.
२) मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६
ई-मेल§desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

<u>तात्काळ : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे</u>
परिपत्रक

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/३६८
दिनांक :- ०९ / ०९ / २०२४

**विषय :** ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा सर्व मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क मध्ये १०० टक्के सवलती बाबत....

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७/१०/२०१७.
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८/०७/२०२४.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४, दि.१९/०७/२०२४.
४. संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३११ दि.२३/०७/२०२४
५. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३४६ दि: -१२/०८ /२०२४
६.संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३५६ दि: -२२/०८ /२०२४
७. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३५७ दि: -२२/०८ /२०२४

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने,

- संदर्भ क्र.३ च्या शासन परिपत्रकान्वये व संदर्भ क्र. ४ च्या तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्रान्वये शैक्षणिक संस्थांनी अशा योजनेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थीनींकडून प्रवेशावेळी शैक्षणिक शुल्क घेण्यात येऊ नये याबाबत कळविले होते.

- संदर्भ क्र. ७ च्या तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्रान्वये संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती

निदर्शनास आणून देऊन, डीबीटी पोर्टलवर संस्थेत शिकत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना संबंधित योजनेसाठीचा परिपूर्ण अर्ज, ऑक्टोबरपूर्वी भरण्याबाबत कळविण्यात यावे. जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही अशीदेखील सूचना देण्यात आली होती.

तरीदेखील डीबीटी पोर्टलवर कमी अर्ज प्राप्त होत असल्याकारणाने,सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, खालीलप्रमाणे पुनःश्च सूचना देण्यात यावी.

१. संस्थांनी त्यांच्या संस्थेतील ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा सर्व मुलींना ( EBC/ EWS/ SEBC/ OBC ) उपरोक्त शासन निर्णय क्र. २ अन्वये शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलती बाबत अवगत करावे.

२. संस्थांनी प्रवेशावेळी घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण (Orientation Programme) कार्यक्रमाच्या वेळी योजनेच्या लाभाबाबतची माहिती देण्यात यावी.

३. संस्थांनी, संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची सदर शिष्यवृत्ती योजनेकरिता विद्यार्थीनींकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज करतेवेळी येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेसाठी नियुक्ती करावी.

४. संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज (नवीन /नुतनीकरण) प्राप्त होण्यासाठी दि.१७/०९/२०२४ ते दि.१९/०९/२०२४ या कालावधीमध्ये संस्थास्तरांवर विशेष मोहिम राबवून, पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्यात यावे.

५. तसेच, विभागीय कार्यालयांनी, उच्च व तंत्रशिक्षण विभागाची, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येत असलेली, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनांतर्गत लाभाचा पहिला हप्ता देण्यासाठी पुरेसा निधी अर्थसंकल्पित आहे. सदर योजनेचा लाभाचा पहिला हप्ता संस्थांना ऑक्टोबरमध्ये प्राप्त होण्यासाठी संस्थांनी संस्थेत शिकणाऱ्या उपरोक्त योजनेंतर्गत डीबीटी पोर्टलवर पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज ( नवीन /नुतनीकरण ) भरुन संस्थांनी तपासणी ( मंजूर /नामंजूर ) करुन डीबीटी पोर्टलवर पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे असेही सर्व संस्थांना कळवावे.

तसेच, विभागीय कार्यालयांना असेही निर्देश देण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व संस्था सदर योजनेची माहिती व प्रसिध्दी लाभार्थी विद्यार्थीनींपर्यंत पोहोचवित आहेत याची खात्री करावी व त्याप्रमाणे उपाययोजना करुन सदर योजनेची माहिती लाभार्थी पर्यंत पोहोचेल याबाबतची कार्यवाही करावी व डीबीटी पोर्टलवर सर्व पात्र विद्यार्थीनींकडून जास्तीत जास्त अर्ज भरले जातील याबाबत वेळोवेळी अर्जांचा आढावा घेऊन त्याप्रमाणे अहवाल संचालनालयास प्रत्येक आठवड्याच्या सुरवातीस desk18@dtemaharashtra.gov.in या ईमेलवर पाठवावा.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत- १. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर. यांना माहिती व त्यांच्या अधिनस्त व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्थांना दिलेल्या सर्व सूचनांचे पालन काटेकोररित्या करण्यासाठी सूचित करण्याकरिता.

२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर.